**पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचा श्रीलंकेच्या राष्ट्रपती समवेत दूरध्वनी वार्तालाप  (24 मार्च 2026)**

24 मार्च 2026

पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांना आज श्रीलंकेचे राष्ट्रपती महामहीम अनुरा कुमारा दिसनायके यांच्या सोबत दूरध्वनी द्वारे संपर्क साधला.

2. दोन्ही नेत्यांनी पश्चिम आशियातील बदलत्या परिस्थितीवर चर्चा केली, ज्यामध्ये जागतिक ऊर्जा सुरक्षेवर होणाऱ्या परिणामांवर भर देण्यात आला.

3. संपूर्ण जगाच्या हितासाठी सागरी मार्ग खुले आणि सुरक्षित ठेवण्याच्या महत्त्वाचा दोन्ही नेत्यांनी पुनरुच्चार केला.

4. दोन्ही नेत्यांनी भारत-श्रीलंका ऊर्जा सहकार्य मजबूत करणे आणि प्रादेशिक सुरक्षा वाढवणे या उद्देशाने सुरू असलेल्या विविध उपक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेतला.

5. भारताचे शेजारी प्रथम धोरण आणि महासागर व्हिजन याला अनुसरून सामायिक आव्हानांना तोंड देण्यासाठी एकत्र काम करण्याच्या भारताच्या दृढ वचनबद्धतेचा पंतप्रधानांनी पुनरुच्चार केला.

6. उभय नेत्यांनी एकमेकांच्या संपर्कात राहण्यावर सहमती दर्शवली.

**नवी दिल्ली**

24 मार्च 2026